संशोधन आराखडा

(Research Synopsis)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखेअंतर्गत राज्यशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.)
पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

संशोधन विषय

रिपाई (आठवले गट) नेतृत्वाचा राजकारणातील प्रभाव : एक अभ्यास

(विशेष संदर्भ महाराष्ट्र राज्य)

संशोधक

अमर रावसाहेब कांबळे

एम.ए., बी.एड., सेट

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मार्गदर्शक

प्रा.डॉ.दत्ताहरी होनराव

राज्यशास्त्र विभागप्रमुख व संशोधन मार्गदर्शक

श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर

संशोधन केंद्र

पीपल्स कॉलेज, नांदेड

२०२१-२२

रिपाई (आठवले गट) नेतृत्वाचा राजकारणातील प्रभाव : एक अभ्यास (विशेष संदर्भ महाराष्ट्र राज्य)

प्रास्ताविक :

भारतातील दलितांच्या चळवळी ह्या सापेक्ष वंचिततेमुळे (Deprivation) निर्माण झालेल्या आहेत. स्वातंत्र्यपूर्व भारतात दोन समांतर चळवळी चालू होत्या. १) देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याची चळवळ २) दलितांच्या गुलाम मुक्तीची सामाजिक न्याय व हक्काची चळवळ. या दुसऱ्या चळवळीतून खऱ्या अर्थाने भारतात सामाजिक व राजकीय नेतृत्त्व उदयास आले. १९४२ शेड्युल्ड कास्ट फेडरेशन या दुसऱ्या राजकीय पक्षाची स्थापना केली. पण याही पक्षाला अपेक्षित सहकार्य सवर्णांकडून मिळाले नसल्यामुळे त्यांनी समविचारी लोकांना एकत्र करून जाती-जमातीच्या पलीकडे जाऊन शोषित राजकारण करण्यासाठी एक नवा पक्ष म्हणून 'रिपब्लिकन पक्षाची' संकल्पना मांडली. दुर्दैवाने या दलितांच्या राजकीय लढ्याचं नेतृत्त्व करणाऱ्या बाबासाहेबाचे ६ डिसेंबर १९५६ ला महापरिनिर्वाण झाले. दलितांच्या लढ्याचे एक महापर्व संपले. स्वतंत्र मजूर पक्ष, शे.का.प. व रिपब्लिकन पक्ष या दलित राजकारणाच्या तीन पायऱ्या आहेत. या काळात बाबासाहेबांनी दलितांना राजकीय हक्क व प्रतिनिधित्व मिळवून देण्यासाठी ब्रिटिशांसोबत व भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या नेत्यासोबत लढत राहिले. संपूर्ण भारताच्या राजकारणात एक वेगळी दलितांची राजकीय अस्मिता निर्माण झाली.

सदरील संशोधन विषयाचा आवाका पहाता व महाराष्ट्रातील राजकारणाकडे दृष्टिक्षेप टाकले असता असे लक्षात येते की, दलितांचे राजकारणातील नेतृत्व स्वतंत्रपणे यशस्वी न होता कोणत्या तरी राजकीय पक्षात यशस्वी होत आहे. रिपाईचे उमेदवार कमी पण अन्य राजकीय पक्षातील दलित नेतृत्त्वाचे प्रमाण वाढलेले आहे. म्हणून प्रकाश आंबेडकर म्हणतात, राजकीय आरक्षणच बंद केले पाहिजे. महाराष्ट्राच्या राजकारणातील दलित नेतृत्वाचा प्रभाव व क्षमता याकडे पाहिले असता ते राजकारणातच निर्णायक ठरू शकतात पण त्यांच्यातील फूट, ऐक्याचा अभाव, याचा फायदा अन्य राजकीय पक्ष घेत आहेत व त्याची राजकीय एकजूट न होऊ देण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे दलिताची मते व नेतृत्त्व विभाजित होऊन महाराष्ट्राच्या राजकारणावर प्रभाव पाडण्यात दलित नेतृत्व अपयशी होत आहे. महाराष्ट्राच्या भावी राजकारणात दलित नेतृत्वाला निर्णायक भूमिका निभवायची असेल तर समान, सर्वमान्य विचारधारा, बौद्धेत्तर दलितेत्तर समाजाना एकत्र करून निवडणुका लढवल्या पाहिजेत. गेल्या दोन निवडणुकीचा प्रवाह पहाता बौद्ध नेतृत्वाला डावलून हिंदू दलितांना प्राधान्य देण्याचा प्रयत्न झालेला दिसून येत आहे.

रिपब्लिकन पार्टीच्या स्थापनेमागील ऐतिहासिक पार्श्वभूमी :

बाबासाहेबांच्या पश्चात त्यांच्या अनुयायांनी ३ ऑक्टोंबर १९५७ ला रिपब्लिकन पक्षाची स्थापना केली. पण या अनुयायांनी आंबेडकरी घराण्याचे नेतृत्त्व नाकारून सामूहिक नेतृत्व उभे केले पण जास्त काळ टिकले नाही. १९५९ पक्षात दुरुस्त व नादुरूस्त अशी फूट पडली. तेव्हापासून आजपर्यंत रिपाईला फुटीचे गृहण लागलेले आहे. १९५७ च्या निवडणुकीचा अपवाद वगळता त्यानंतरच्या कोणत्याही निवडणुकीत रिपाईला भरीव राजकीय यश प्राप्त

करता आले नाही. यापाठीमागची कारणमीमांसा पाहिली असता कारणे दिसून येतात. त्यात नेत्यातील राजकीय ऐक्याचा अभाव, तत्त्वहीन राजकीय तडजोडी, अंतर्गत मतभेद, निश्चित विचारसरणी व धोरणांचा अभाव इ. मुळे दलित नेतृत्वाला आपला प्रभाव निर्माण करता आला नाही. १९७० च्या दशकात मात्र दलित पँथरच्या उदयाने आंबेडकरी समाजात एक नवचैतन्य निर्माण झाले. पँथरच्या उदयामुळे अनेक नवीन दलित नेतृत्व उदयास आले. प्रकाश आंबेडकर, रामदास आठवले, राजा ढाले, नामदेव ढसाळ, प्रा.अरूण कांबळे, जोगेंद्र कवाडे इ. या काळात 'भूमीहिनाचा सत्याग्रह' व 'नामांतर आंदोलन' या घटना अभूतपूर्व होत्या. पँथर संघटनेतही विचारसरणीतल्या अंर्तविरोधातून फाटाफूट पडली. त्यामुळे पुन्हा एकदा आंबेडकरी समाज राजकीयदृष्ट्या दिशाहीन झाला. आज प्रत्येक आंबेडकरी नेता स्वतःचे राजकीय अस्तित्व शोधण्याचा व टिकविण्याचा प्रयत्न करत आहे. पण त्याला म्हणावे तेवढे यश येत नाही. त्यासाठी तो तत्त्वहीन तडजोडी, युती, आघाडी करू पहात आहे. उदा.रिडालोस, भीमशक्ती, शिवशक्ती युती इ. रिपाईची आजपर्यंतची ओळख ही एकजातीय राहिल्यामुळे काही बौद्ध व बौद्धेत्तर जातीचे राजकीय नेतृत्व इतर राजकीय पक्षात कार्य करत आहेत पण त्यांच्या कार्याला व नेतृत्त्वाला राजकीय मर्यादा आहेत.

वरील प्रस्तावनेतून माझ्या संशोधन विषयाची थोडक्यात भूमिका मांडली आहे.

विषय निवडीमागील भूमिका :

"राजकारणातील रिपाई (आठवले गट) नेतृत्वाच्या प्रभावाचा अभ्यास (विशेष संदर्भ महाराष्ट्र राज्य)" हा विषय मला संशोधनासाठी आकलन होण्याचे कारण की मी संबंधित समाजाचाच एक घटक असून मला असे वाटते की, बहिष्कृत दलित समाजाला सामाजिक सुधारणेचा व डॉ.बाबासाहेबांसारख्या दृष्ट्या नेतृत्त्वाचा वारसा असतानासुद्धा बाबासाहेबाच्या पश्चात त्याच्या अनुयायांना बाबासाहेबांच्या विचारधारेनुसार, राज्यकर्ती जमात बनण्याचे त्याचे स्वप्न का पूर्ण करता येत नाही; हा माझ्या चिंतनाचा विषय आहे. या समस्येच्या निराकरणासाठी यावर तपशिलात जाऊन अध्ययन व कारणाचा शोध घेऊन अभ्यासांती जर मला काही विधायक सूचना करता आल्या तर योग्यच होईल. म्हणून या कुतुहलापोटी मी या विषयाची संशोधनासाठी निवड केलेली आहे.

साहित्य पुनरावलोकन :

मागील काही दशकामध्ये भारतातील काही बहिष्कृतांच्या वेगवेगळ्या पैलूंवर अध्ययन करण्यात आलेले आहे. ते अध्ययन सामाजिक, मानवंशशास्त्रीय राजकीय स्वरूपाचे होते. यापैकी राजकीय अंगाने दलिताचा अभ्यास फारसा झालेला नाही. तो सामाजिक व सांस्कृतिक अंगाने झाला आहे. पण सामाजिक व सांस्कृतिक अंगाबरोबरच राजकीय अंगानेही दलितांचा अभ्यास व्हायला पाहिजे होता. भारतातील विशेषतः तामिळनाडू, पंजाब, ओरिसा, उ.प्रदेश, महाराष्ट्र, गुजरात इ. राज्यात राजकीय अंगाने झालेला आहे. महाराष्ट्राच्या संदर्भात मात्र दलितांच्या राजकीय सहभागाबाबतचे अध्ययन बऱ्यापैकी झालेले आहे. कारण भारतातील दलित चळवळ व राजकारण याचे नेतृत्व बाबासाहेबांमुळेच विकसीत झाले. म्हणून इतर राज्याच्या तुलनेत दलितांचे राजकारण यावर अध्ययन झालेले आहे. आंबेडकरोत्तर आर.पी.आय. आठवले गटाचे राजकारण, राजकीय सहभाग व नेतृत्त्व यासंदर्भातला अभ्यास करत असताना मी उपलब्ध असलेल्या साधनाद्वारे पुढीलप्रमाणे संक्षिप्त स्वरूपात करणार आहे.

रजनी कोठारी (१९५४) सुप्रसिद्ध राजकीय विचारवंत व अभ्यासिका यांनी आपल्या **'Caste in Indian Politics'** या ग्रंथात भारतातील जातीव्यवस्थेची भूमिका यांचा मुलभूत अंगाने अभ्यास केलेला आहे. त्यांच्या मते, जातीव्यवस्थेमुळेच भारताच्या राजकारणात गतीशिलता निर्माण झाली. **आनंद तेलतुंबडे** (२००७) यांनी त्यांचा **'Uttar Pradesh : A Mayawati Revolution : E.P.W.'** च्या अंकात उत्तर प्रदेशातील मायावती यांनी सामाजिक अभियांत्रिकी प्रयोगाद्वारे उच्च जातीशी राजकीय तडजोडी करून सत्ता प्राप्त केली. याचा आदर्श इतर राज्यातील दलित नेतृत्त्वाने घ्यावा असे हा लेख सूचवतो. (दलिताचे प्रश्नाचे राजकीय विश्लेषक) **भोळे भा.ल.** (२००८) महाराष्ट्रातील प्रसिद्ध राजकीय विश्लेषक, राज्यशास्त्राचे प्राध्यापक **'संदर्भ दलित चळवळीचा'** या ग्रंथात एकूण बावीस वैचारिक लेख लिहिलेले आहेत. या लेखांच्या माध्यमातून त्यांनी महाराष्ट्रातील दलित चळवळीच्या वाटचालीतील टप्पे व दलित चळवळीचा प्रवास, दलित नेतृत्त्वाची बलस्थाने, मर्मस्थाने, दलित पँथरची जडणघडण व तिची राजकीय भूमिका इ. चा ऊहापोह केलेला आहे. **गेल ऑमवेट** (२००९) यांनी महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीचा सखोल अभ्यास केलेला आहे. **'आंबेडकर व त्यानंतरच्या कालखंडातील भारतातील दलित चळवळ'** या लेखात बीएसपी, रिपाई व दलित नेतृत्त्व यांचा अभ्यास केला. दलित नेतृत्त्वाने इतर राजकीय पक्षाशी युती करून सत्तेत सहभागी व्हावे असे निष्कर्ष काढलेले आहेत. **डॉ.शरणकुमार लिंबाळे** (२००९) हे महाराष्ट्रातील प्रसिद्ध दलित साहित्यिक आहेत. त्यांनी दलित साहित्यावर विपूल लेखन केलेले आहे. त्यांनी त्यांच्या **'रिपब्लिकन पक्ष : वास्तव आणि वाटचाल'** या ग्रंथात दलिताचा राजकीय पक्ष रिपाईवर वैचारिक पातळीवर वस्तुस्थितीचा व वाटचालीचा आढावा घेतलेला आहे.

संशोधनाचे महत्त्व :

प्रस्तुत संशोधन विषयाचे महत्त्व हे भारताच्या बहिष्कृत राजकारणाच्या विशेषत: महाराष्ट्रातील दलित राजकारणाच्या संदर्भात अनन्यसाधारण आहे. या संशोधन अभ्यासामुळे महाराष्ट्राच्या राजकारणातील आर.पी.आय. च्या राजकारणाचा तपशीलवार अभ्यास केला जाणार आहे. या अभ्यासातून हाती आलेले निष्कर्ष मांडले जाणार आहेत. यापूर्वी महाराष्ट्राच्या राजकारणातील दलित नेतृत्वावर काही प्रमाणात अभ्यास झालेला आहे. पण या संशोधनाने तपशीलात जाऊन अध्ययन केले जाणार आहे. या संशोधनाचा उपयोग महाराष्ट्राच्या राजकारणाची समीकरणे जुळवताना दलित नेत्यांना व इतर राजकीय पक्षांनाही होणार आहे. या संशोधनातून दलितांच्या नेतृत्वाचा प्रभाव अधोरेखित होणार आहे. भविष्यात होणाऱ्या नव-संशोधकांना याचा निश्चितच फायदा होईल असे मला वाटते.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा:

प्रस्तुत संशोधन विषयाची व्याप्ती ही तशी व्यापक होऊ शकते. पण संशोधनाच्या सोयीसाठी म्हणून ती केवळ आर.पी.आय. (आठवले गट) राजकारणापुरती मर्यादित ठेवण्यात आलेली आहे. या प्रबंधाच्या विषयानुसार दलित म्हणजे अनुसूचित जाती वर्गातील विशेषत: आंबेडकरी किंवा रिपाई राजकीय नेतृत्वाचा अभ्यास केला जाणार आहे. या अभ्यासासाठी कालावधी १९५६ ते १९७० व १९७० ते २०२३-२४ असा गृहित धरलेला आहे. कारण खऱ्या अर्थाने या काळातच आंबेडकरी राजकीय नेतृत्त्वाची भरभराट व ऱ्हास झालेला दिसून येतो. उपलब्ध साधनसामुग्रीच्या मर्यादा समोर ठेवून प्रस्तुत संशोधन कार्य पूर्णत्वास नेण्याचा प्रयत्न

केलेला आहे. रिपाई (आठवले गट) नेतृत्वाचा महाराष्ट्रातील प्रभाव ही या संशोधनाची मर्यादा सांगता येईल.

<u>संशोधनाची उद्दिष्ट्ये</u> (Objectives):

प्रस्तुत संशोधनासाठी खालील उद्दिष्ट्ये निश्चित केलेली आहेत.

१) आर.पी.आय. व इतर नेतृत्वाच्या राजकीय उदयाची पार्श्वभूमी अभ्यासणे.

२) भारतीय राजकारणातील धार्मिक, जातीय, आर्थिक, आरक्षणविषयक घटक व अनुसूचित जातीचा प्रभाव अभ्यासणे.

३) रिपाई (आठवले गट) यांचे राजकीय नेतृत्व व इतर राजकीय पक्षातील अनुसूचित जातीचे नेतृत्व यांचा तुलनात्मक प्रभाव अभ्यासणे.

४) रिपाई ऐक्याच्या उणिवा व कारणांचा शोध घेणे.

५) पुणे करार आणि आर.पी.आय. नेतृत्व यातील सहसंबंध अभ्यासणे.

६) नेतृत्वाचा प्रभाव निर्माण करणाऱ्या घटकांचा शोध घेणे.

<u>संशोधनाची गृहितके</u> (Hypothesis) :

प्रस्तुत संशोधनासाठी खालील गृहितके ठरविण्यात आली आहेत.

- एकूणच राजकारणात बहिष्कृत नेतृत्वास स्वतःच स्वतंत्र प्रभाव निर्माण करता आला नाही.
- रिपाई राजकीय फुटीस दलित नेत्यांचे स्वार्थी राजकारण कारणीभूत आहे.
- रिपाई आठवले गट नेतृत्वाकडे व्यापक वैचारिक विचारसरणीचा अभाव आहे.
- बहिष्कृत गणल्या गेलेल्या समाजाच्या सहभागाशिवाय कोणत्याही पक्षाची राजकीय समीकरणे जुळत नाहीत.
- पुणे करारामुळे बहिष्कृत गणलेल्या समाजास राजकीय अधिकार मिळून त्यांचा सर्वांगीण विकास झालेला आहे.
- बहिष्कृत समाज आज आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण करण्यात यशस्वी झाला आहे.

<u>संशोधन पद्धती व तंत्रे (Research Methodology & Techniques)</u>:

सदरील संशोधनासाठी वर्णनात्मक (Descriptive) व निदानात्मक संशोधन आराखडा (Dignosis Research Design) या दोन आराखड्याचा संयुक्तरीत्या वापरुन समस्येचे ज्ञान करून घेतलेले आहे व गृहितकृत्याद्वारे समस्येवर अध्ययन करून निष्कर्ष काढण्यात येईल.

प्राथमिक स्त्रोत :

क्षेत्रिय शोध (Field work) पद्धतीने माहिती मिळविण्यात येईल. . प्रत्यक्ष स्त्रोत पद्धती (Interview) अनूसूची (Schedule) यांचा वापर करुन काही प्रमुख दलित नेत्यांची, सामाजिक कार्यकर्त्यांकडून माहिती संकलित केली जाईल. तसेच काही राजकीय पातळीवरच्या दलित नेतृत्वाला भेटता न आल्यामुळे अप्रत्यक्ष स्त्रोताद्वारे (Indirect source) म्हणजेच सरंचित मुक्त प्रश्नावली (Structured Open Questionnarie) वापर करण्यात येणार आहे.

दुय्यम स्त्रोत :

प्राथमिक स्वरूपाच्या माहितीतील वस्तुनिष्ठता तपासून पाहण्यासाठी व प्राथमिक तथ्यांना वस्तुनिष्ठतेचा पुरावा देण्यासाठी म्हणून या दुय्यम स्त्रोतांचा आधार घेण्यात येईल.

दुय्यम स्त्रोतांचा एक भाग म्हणून व्यक्तिगत प्रलेख (Personal Document) म्हणजेच आत्मचरित्र (Autobiography), पत्रे (Letters) चा वापर करण्यात आलेला आहे. यात काही निवडक दलित लेखक, साहित्यिक व राजकीय नेते व सामाजिक कार्यकर्त्यांच्या आत्मकथनाचा अभ्यास केलेला आहे. तसेच काही पत्रव्यवहाराचाही अभ्यास करण्यात आलेला आहे. सार्वजनिक प्रलेख (Public Documents) प्रकाशित प्रलेखातील प्रकाशित आकडेवारी (निवडणूक अहवाल विश्लेषण), खाजगी संस्थांचे अहवाल, सामाजिक संशोधन संस्था, विविध नियतकालिकांतील संशोधकांचे लेख, ग्रंथ, नियतकालिके, मासिके, साप्ताहिके, वर्तमानपत्रे, व साहित्य समीक्षा, इलेक्ट्रॉनिक माध्यमे इ. अप्रकाशित सार्वजनिक प्रलेखात संशोधन अहवाल, पीएच.डी. संशोधन प्रबंध इत्यादीद्वारे माहिती संकलीत करण्यात येईल.

नमूना निवड (Sampling Method):

प्रस्तुत संशोधनासाठी नमूना निवडीतला **गैर संभाव्य नमूना** (Non-probability Sampling) निवड हा प्रकार निवडलेला आहे. त्यात सहेतूक नमुना पद्धत निर्धारित केलेली आहे. इथे संशोधनासाठी नेते, कार्यकर्ते व सामान्य जनता यापैकी सोयीनुसार त्यांची निवड करण्यात येईल.

साहित्य संदर्भ पद्धत (Method of Reference):

संशोधनास संदर्भ देण्यासाठी पुढील पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे. प्रस्तुत संशोधन प्रबंधात सामाजिक शास्त्रासाठीच्या जागतिक पातळीवर वापरल्या जाणाऱ्या APA (Americal Psychological Association) च्या पाचव्या व सहाव्या आवृत्तीच्या (नाव आणि वर्ष पद्धत) मार्गदर्शक सूचनांचा वापर करण्यात येणार आहे.

तथ्यांचे विश्लेषण (Analysis and Interpretation of Data) :

माहिती संकलन केल्याने संशोधन पूर्ण होत नसून त्यासाठी त्या माहितीचे उद्देशानुरूप विश्लेषण केले पाहिजे. वरील गृहीतकानुसार प्रबंधात मांडलेल्या गृहीतकृत्याची पडताळणी करून निष्कर्ष मांडण्यात येतील. तथ्यांचे विश्लेषण करण्यासाठी पुढील पद्धत अवलंबिलेली आहे. 1) तथ्यांचे परीक्षण 2) तथ्यांचे वर्गीकरण 3) तथ्यांचे सांकेतिकीकरण, 4) सारणीकरण आणि 5) पृथ्थकरण

परिशिष्ट (Appendix):

संशोधन माहिती गोळा करण्यासाठी व अहवालातील मुद्द्यांच्या मांडणीस अत्यावश्यक नसलेला पण समर्थनास पूरक ठरणारा मजकूर म्हणून पुढील परिशिष्ट्ये जोडण्यात येणार आहेत.

- प्रश्नावलीचा नमूना
- महाराष्ट्रातील रिपाई दलित नेत्याची व गटाची यादी
- महाराष्ट्राच्या निवडणूकीत रिपाई नेतृत्त्वाच्या यश-अपयशांचे निवडणूक विश्लेषण आलेख / तक्ता

: प्रकरणनिहाय संक्षित घोषवारा :

प्रकरण पहिले

“स्वातंत्र्यपूर्व भारतातील व महाराष्ट्रातील नेतृत्वाच्या राजकारणाची पार्श्वभूमी”

शोधप्रबंधाच्या पहिल्या प्रकरणात विषयाच्या अनुषंगाने स्वातंत्र्यपूर्व भारतातील व महाराष्ट्रातील नेतृत्वाच्या राजकारणाची पार्श्वभूमीची मांडणी करण्यात येईल.

प्रकरण दुसरे

“डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय योगदान व दलित समाज”

प्रस्तुत प्रकरणात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान अभ्यासून दलित समाजाच्या आर्थिक-सामाजिक-राजकीय स्थितीवर प्रकाश टाकण्यात येईल.

प्रकरण तिसरे

“रिपाई (आठवले गट) राजकारण व नेतृत्त्व”

प्रस्तुत तिसऱ्या प्रकरणात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) चा महाराष्ट्रातील प्रभाव कसा निर्माण झाला आहे व यात रिपाईच्या नेतृत्वाचे योगदान अभ्यासण्यात येईल.

प्रकरण चौथे

“आंबेडकरी नेतृत्वाचा दुसरा टप्पा व त्याचे राजकारण”

या प्रकरणात आंबेडकरोत्तर राजकीय नेतृत्वाचा प्रभाव व दलित राजकारणावरील अनुकूल प्रतिकूल परिणाम अभ्यासण्यात येतील.

प्रकरण पाचवे

“अनुसूचित जातीच्या नेतृत्वाचे यशापयश”

प्रस्तुत प्रकरणात अनुसूचीत जातीच्या नेतृत्वाचे यश आणि अपयश यांचा धांडोळा घेण्यात येईल. यात मुलाखत अनुसूचीद्वारे प्राप्त माहितीचे विश्लेषण करण्यात येईल.

प्रकरण सहावे

“निष्कर्ष व सूचना”

प्रस्तुत प्रकरणात संशोधनाअंती जे निष्कर्ष (findings / outputs) हाती येतील त्याची मांडणी करण्यात येईल.

: संदर्भ ग्रंथ सूची :

ढसाळ, नामदेव (1973) *दलित पँथरची भूमिका,* पँथर प्रकाशन, पुणे

लिंबाळे, शरणकुमार (1989) *दलित पँथर*, सुगावा प्रकाशन, पूणे

खैरमोडे चां.म. (1992) डॉ.भीमराव रामजी आंबेडकर खंड-10, पुणे

पंडित, नलिनी (1996) *जातीवाद व वर्गवाद*. लोकवाङ्मयगृह, मुंबई

पाटील, राजेंद्र (1997) *रिपब्लिकन पार्टी : काल आणि आज*, अजेय प्रकाशन नागपूर

मेणसे, कृष्णा (1998) *डॉ.बाबासाहेब आंबेडकर : सामाजिक व राजकीय चळवळी,* न्यू एज प्रिंटिंग प्रेस, मुंबई

कसबे, रावसाहेब (1998) *दलित चळवळीची वाटचाल*, केशवगोर स्मारक ट्रस्ट,मुंबई

पवार, ज.वि. (1999) *आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळ*, अस्मिता पब्लिकेशन, खंड 1 ते 8
ढाले, राजा (1999) *दलित पँथरची संस्थापना वस्तुस्थिती आणि विपर्यास*
पळशीकर, सुहास (2003) *जात व महाराष्ट्रातील राजकारण*, सुगावा प्रकाशन, पुणे.
आंबेडकर, बाळासाहेब. (2005) *स्वाभिमानी आंबेडकरी चळवळीची दिशा*, कौशल्य प्रकाशन, नागपूर.
बगाडे, उमेश (2006) *महाराष्ट्रातील प्रबोधन व वर्गजाती प्रभूत्त्व*, सुगावा प्रकाशन,पुणे
पळशीकर, सुहास व कुलकर्णी सुहास (2007). *महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष* समकालीन प्रकाशन, पुणे.
लिंबाळे, शरणकुमार (2009) *रिपब्लिकन पक्ष वास्तव व वाटचाल*, दिलीपराज प्रकाशन, नागपूर.
शहा, घनश्याम (2010) *भारतातील सामाजिक चळवळी*, डायमंड प्रकाशन, पुणे
कांता, अभय व इतर (2011) *रिपब्लिकनची हाराकिरी,* परिवर्तनाचा वाटसरू (संपा.) पुणे.
ढगे, एस. आणि हासे, सी. 'संशोधन पद्धती' के.एस. पब्लिकेशन, पुणे.
घोटाळे रा.ना.(1992) 'समाजशास्त्रीय संशोधन तत्त्वे आणि पद्धती', मंगेश प्रकाशन,नागपूर.
आगलावे, प्रदिप (2000) 'संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे', विद्या प्रकाशन, नागपूर
भांडारकर, पु.ल. (1987) 'सामाजिक संशोधन पद्धती', महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर.

English References

Teltumbde, Anand. (1997) *Dr.Ambedkar Pratik, Vasav Va Nawa Anwayarth*, Sugava Publication, Pune.
Teltumbde, Anand. (2009) *Globalization and Dalits : Perspective of Buddist Economics*, Mumbai.
Sharma, P.K. (2006) *Dalit Politics and Literature*, Shipra Pub.
Gail, Omvet. (2006) *Dalit Vision : The Anti-caste Movement and the Contruction of an Indian Identify,* Orient Longman. (R.Ed.), New Delhi.
Eleanor. Zelliot (1996). *From untouchable to Dalit : Essay on the Ambedkar Movement*. Publisher Manohar
Kanchya, Iiah, (2009) *The post Hindu India a discourse on Dalit Bahujan, Socio spiritual and scientific Revolution*, Sage Publication, New Delhi
Guru,Gopal (2005). *Atrophy in Dalit Politics*. Dic book series, Volume-1 California
Teltumbde, Anand. (1997) *Ambedkar in and for the post Ambedkar Dalit movement.* Sugava Publication, Pune.

संशोधक
अमर रावसाहेब कांबळे

मार्गदर्शक
प्रा.डॉ.दत्ताहरी रामराव होनराव